# जाहिरात

## वैद्यकिय अधिकाऱ्यांची पदे भरण्याकरीता समिती, वर्धा

## वैद्यकिय अधिकारी, गट-अ च्या पदाची (संक्षिप्त) जाहिरात

क्र.जिपव/आरोग्य/आस्था-१-अ- १/२०१७, दि.१५/०७/२०१७

---

जिल्हा समिती वर्धा मार्फत वैद्यकिय अधिकारी, गट-अ दर्जाची पदे मुलाखतीद्वारे **(Walk-in-Interview)** भरण्यात येणार आहेत. सदर पदासाठी अर्जाचा नमुना जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांच्य **www.wardha.nic.in** व **www.zpwardha.in** या कार्यालयीन अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उमेदवारांनी सदर अर्ज डाऊनलोड करुन संपुर्ण व भरलेला अर्ज, मुळ प्रतिज्ञापत्र व आवश्यक त्या कागदपत्राच्या सांक्षाकिंत प्रतीसह जिल्हाधिकारी वर्धा यांच्या नावाने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा या कार्यालयात दिनांक १६/०७/२०१७ ते दिनांक २५/०७/२०१७ या कालावधीत हस्तबटवडयाने/नोंदणीकृत डाकेने मागविण्यात येत आहे.

वरील कालावधीत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी मुलाखतीसाठी **(Walk –in-interview)** दिनांक ०१/०८/२०१७ रोजी मुळ कागदपत्रासह मा.जिल्हाधिकारी, वर्धा या कार्यालयात सकाळी १०.०० वाजता उपस्थित राहावे.

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतनश्रेणी | भरावयाची पदे |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी गट-अ (एम.बी.बी.एस) | पी.बी.१५६००-३९१०० ग्रेड वेतन ५४०० | १४ |

वरील पदांसाठीची सविस्तर जाहिरात, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांची संख्या विहित परिक्षा शुल्क, अर्ज करावयाची पध्दत, विविध महत्वाचे दिनांक, परिक्षेबाबत तपशिल व इतर महत्वाच्या सर्व सुचना सविस्तरपणे जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांच्या **www.wardha.nic.in** व **www.zpwardha.in** या कार्यालयीन अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

ठिकाण :- वर्धा

दिनांक :- १५/०७/२०१७

स्वा/-
डॉ. दुर्योधन गो.चव्हाण
सदस्य सचिव तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, वर्धा

स्वा/-
शैलेश नवाल
अध्यक्ष
जिल्हाधिकारी, वर्धा

महाराष्ट्र शासन

# वैद्यकिय अधिकारी, गट-अ ची पदे भरण्याकरीता जाहिरात

संदर्भ :-

१. आरोग्य विभाग क्र.संकिर्ण—२०१५/प्र.क्र.१२/निवडमंडळ, दि.२६ फेब्रुवारी २०१६
२. शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमवैअ-२०१५/प्र.क्र.७३९/निमं/सेवा-३, दि.२४ जुन २०१६
३. शासन परिपत्रक, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमवैअ-२०१५/प्र.क्र.७३९/सेवा-३, दि.२६ ऑक्टोबंर २०१६
४. महाराष्ट शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक पदनि २०१५/प्र.क्र ४४१/सेवा ३ दिनांक ३ डिसेंबर २०१६
५. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,राष्टीय आरोग्य अभियान मुंबई यांचे पत्र क्रमांक.जा.क्र. राआसो/मनुष्यबळ/पदभरती/१०४५२-४१७/२०१७. दिनांक ४/५/२०१७
६. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक मवैअ २०१७/प्र.क्र/१८१/१७/सेवा ३, दिनांक ४ मे २०१७

जहिराता क्रमांक : क्र.जिपव/आरोग्य/आस्था-१-अ/१/२०१७, दि. १५ /०७ /२०१७ नस्ती क्रमांक : १

१) वर्धा जिल्हयातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थामध्ये महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील वैद्यकिय अधिकारी या पदावरील भरतीकरीता पात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.
२) महाराष्ट्र वैद्यकिय व आरोग्य सेवा गट-अ या संवर्गातील वैद्यकिय अधिकारी या पदावर सरळसेवेने पदभरती करण्यासाठी **www.wardha.nic.in** व **www.zpwardha.in** या संकेतस्थळामार्फत अर्जाचा नमुना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
३) उमेदवारांनी अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या नावाने जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा या कार्यालयात हस्त बटवडयाने/नोंदणीकृत डाकेने सादर करावा.
४) पदसंख्या १४ (पदसंख्येत तसेचआरक्षणा मध्ये बदल होऊ शकतो.)

आरक्षण :

| प्रवर्ग / समांतर आरक्षण | अ.जा. | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र | इ.मा.व. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) सर्वसाधारण | ० | १ | १ | १ | १ | १ | ० | ० | ३ | ८ |
| २) महिला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ५ |
| ३) खेळाडु | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| ४) टपंग | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | १ | १ | १ | १ | १ | १ | ० | ० | ८ | १४ |

(वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) साठी राखीव पदे आंतरपरिवर्तनीय असुन वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड) चे उमेदवार उपलब्ध झाले नाहीत तर शासन आदेशानुसार सदर पदे वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) मधुन आंतरपरिर्वतनीय नियमानुसार भरण्यात येतील)

- मागासवर्ग खेळाडु यांचे आरक्षण शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार राहील.
- वर नमुद केलेल्या पदांची संख्या व आरक्षण वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार राहील.
- वर नमुद पदातील आरक्षण कमी अधिक करण्याचे अधिकार समितीस राहील.

५) अपंगासाठीचे आरक्षण :- शासन अधिसुचना सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.अपंग २/५५/आर-२, दि.२७ जुलै २००४ नुसार अपंग उमेदवारामधील फक्त क्षिणदृष्टी व अस्थिव्यंग (एका पायाने अपंग) उमेदवारच सदर पदासाठी पात्र असुन जो उमेदवार अशा प्रकारच्या अपंगत्व स्पष्टपणे नमुद केलेले प्रमाणपत्र सादर करेल त्याच उमेदवाराचा सदर भरती प्रक्रियेत विचार होईल. अपंगाचे आरक्षण हे शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.अपंग २००७/प्र.क्र.६१/सुधार३, दि.२० एप्रिल २००६ नुसार अवलंबविण्यात आले आहे.

६) वेतनश्रेणी :- रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.५४०० व इतर अनुज्ञेय भत्ते (अंदाजे एकत्रीत वेतन रु. ५००००/-) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमवैअ-२०११/प्र.क्र.७७६/सेवा-३, दि.१४ डिसेंबर २०११ अन्वये पदव्युत्तर पदविका धारक उमेदवारांना ३ अतिरीक्त वेतनवाढी व पदव्युत्तर पदवी धारक उमेदवारांना ६ अतिरिक्त वेतनवाढी अनुज्ञेय राहतील त्यामुळे विशेषज्ञ वैद्यकिय अधिकाऱ्यांचे वेतन एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकिय अधिकाऱ्यापेक्षा जास्त असेल.

७) वय :-

७.१ दिनांक ३० जून २०१७ रोजी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे. मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत नियमाप्रमाणे शिथीलक्षम.

७.२ शासकीय वैद्यकिय सेवेत स्थायी/अस्थाई/बंधपत्रित स्वरुपात कार्यरत असणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा जास्तीत जास्त <u>५ वर्ष शिथील करण्यात येईल</u>.

७.३ शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमवैअ-२०११/प्र.क्र.७४५/११/सेवा-३, दि.३ ऑक्टोबंर २०१३ या मधील नमुद विशेतज्ञ शाखेतील असाधारण किंवा अतिविशेतज्ञ शैक्षणिक अर्हताधारण केलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा <u>जास्तीत जास्त १० वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल</u>.

८) शैक्षणिक अर्हता :-

८.१ वैद्यकिय अधिकारी (एम.बी.बी.एस) पदासाठी संविधानिक विद्यापीठाची एम.बी.बी.एस पदवी किंवा भारतीय वैद्यकिय परिषद अधिनियम १९५६ ( १९५६ चा १०२ ला जोडलेल्या प्रथम किंवा द्वितीय अनुसुचित विनिर्दीष्ट केलेली अन्य कोणतीही अर्हता धारण उमेदवारही अर्ज करु शकतील. )

८.२ वैद्यकिय अधिकारी (विशेतज्ञ) पदासाठी :- संविधानिक विद्यापीठाची बालरोगचिकित्सा किंवा शल्यचिकित्सा किंवा औषधवैद्यक किंवा स्त्रीरोग चिकित्सा किंवा बधिरीकरण किंवा मनोविकृतीशास्त्र किंवा नेत्र शल्य चिकित्सक किंवा क्ष-किरणशास्त्र किंवा विकृतीशास्त्र किंवा अणु जीवशास्त्र किंवा रक्त संक्रमण या विशेतज्ञ शाखेतील भारतीय वैद्यकिय परिषद अधिनियम १९५६ (१९५६ चा १०२ ला जोडलेल्या प्रथम किंवा द्वितीय अनुसुचित विनिदीष्ट केलेल्या शाखेतील पदव्युत्तर पदविका किंवा पदवी.

८.३ ३१ डिसेंबर २०१६ या दिनांकापुर्वी अथवा दिनांकास आंतरवसियता (Internship) पुर्ण असणारे उमेदवारच पात्र ठरतील.

५) निवडप्रक्रिया :-

| तपाशिल | एम.बी.बी.एस.शैक्षणिक अर्हता धारकासाठी गुणांचे प्रमाण **(Weightage)** | पदव्युत्तर/पदविका शैक्षणिक अर्हता धारकासाठी गुणांचे प्रमाण **(Weightage)** |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| पदवी परीक्षेच्या सर्व वर्षामध्ये मिळालेले सरासरी गुण | ६० (जास्तीत जास्त ६० गुण) | लागु नाही |
| पदव्युत्तर पदविका किंवा पदव्युत्तर पदवी परीक्षेमध्ये मिळालेले सरासरी गुण | लागु नाही | ६० (जास्तीत जास्त ६० गुण) |
| शासन सेवेत वैद्यकिय अधिकारी या पदावर अस्थायी किंवा बंधपत्रित स्वरुपात केलेली एकुण सेवा | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ४ गुण आणि बिगर आदिवासी भागातील सेवेसाठी प्रत्येक सहामाहीला ३ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |
| शासन सेवेत नसल्यास पदवी परीक्षा उत्तीर्ण होऊन झालेले एकुण वर्ष | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण | प्रत्येक वर्षाला २ गुण याप्रमाणे जास्तीत जास्त २० गुण |

टिप :-

(१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र.मवैअ-१०१०/३९०/प्र.क्र.३६६/सेवा-३, दि.१९ जुन २०१० अन्वये आदिवासी भागातील आरोग्य संस्था घोषीत करण्यात आल्या असुन, सदर आरोग्य संस्थामधील वैद्यकिय अधिकारी पदावरील कामाचा अनुभव मुल्यांकनासाठी विचारात घेण्यात येईल.

(२) उमेदवाराने सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रमाणपत्र देण्यासाठी संबधीत संस्था/कार्यालय यांचे प्रमुख हे सक्षम प्राधिकारी असतील.

(३) उमेदवारांची सेवा ही प्रत्येक सहामाही मध्ये मोजण्यात येईल. सहा महिन्यापेक्षा कमी सेवेसाठी गुण (Weightage) देण्यात येणार नाहीत.

(४) अनुभवासाठीच्या गुणांच्या मुल्यांकनासाठी जाहिरातीच्या पुर्वीची दिनांक अतिम राहील.

(५) निवड प्रक्रियेसाठी विहित करण्यात आलेल्या निकषानुसार गुणांचे मुल्याकंन करण्यासाठी सर्व गुणपत्रके/प्रमाणपत्रे यांच्या सांक्षाकिंत प्रती उमेदवाराने अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा, उमेदवारांचा अर्ज रद्दबातल करण्यात येईल.

(६) प्राप्त अर्जाची छाननी करुन दि.२६ ऑक्टोबंर २०१६ च्या शासन परिपत्रकानुसार गठित करण्यात आलेल्या समितीमार्फत व दि.२४ जुन २०१६ च्या शासन परिपत्रकात नमुद विहित कार्यपध्दतीनुसार पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

(७) केवळ गुणवत्तेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्तीच्या ठिकाणाचा पसंतीक्रम दर्शविण्याकरीता समुपदेशनाकरीता बोलविण्यात येईल.

(८) समितीने सादर केलेली गुणवत्ता यादी आणि उमेदवारांच्या नियुक्तीचा पसंतीक्रम याची तपासणी करुन उमेदवारास नियुक्ती आदेश **www.wardha.nic.in** व **www.zpwardha.in** शासन संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

(९) नियुक्ती आदेशानंतर संबधित वैद्यकिय अधिकारी नियुक्तीच्या ठिकाणी रुजु झाल्यानंतर त्यांची सेवार्थ प्रणालीमध्ये नोंद करण्यात येईल.

(१०) नवनियुक्त वैद्यकिय अधिकाऱ्यासाठी मुख्यालयी राहणे बंधनकारक राहील. त्यांचे वेतन हे आधार संलग्न बायोमेट्रीक हजेरी व्दारे अदा करण्यात येईल.

(११) सर्वसाधारण

११.१ सदर नियुक्ती ही वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या शासन निर्णयाच्यातसेच विभागीय परिपत्रकांच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

११.२ निवड झालेल्या उमेदवारास कोणत्याही प्रकारचा खाजगी व्यवसाय करता येणार नाही.

११.३ निवड झालेल्या उमेदवाराने महाराष्ट्र मेडीकल कौन्सील ॲक्ट १९६५ (महाराष्ट्र XLVI १९६५) किंवा इंडियन मेडीकल कौन्सील ॲक्ट १९५६ (१९५६ चा १०२) नुसार त्यांचे/तिचे नाव नोंदविणे अनिवार्य आहे.

(१२) महत्वाचे

१२.१ उमेदवारांनी १०० रुपयांया मुद्राकपत्रावर नोटरी समोर आवेदनपत्रात नमुद केलेल्या माहितीच्या अचुकतेबाबत आणि सत्यतेबाबत प्रतिज्ञापत्र सादर करावे.

१२.२ प्रतिज्ञापत्राचा नमुना **www.wardha.nic.in** व **www.zpwardha.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१२.३ आवेदन पत्रासोबत सदर प्रतिज्ञापत्र जोडुन पाठविणे आवश्यक आहे. अन्यथा आवेदनपत्र अपुर्ण समजुन फेटाळले जाईल.

१२.४ प्रमाणपत्रांच्या पडताळणी प्रक्रियेवेळी उमेदवारांनी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

(१३) अर्ज

१३.१ सदर अर्ज www-wardha.nic.in/www.zpwardha.in या संकेतस्थळावर उपलब्ध होतील.

१३.२ उमेदवाराने खाली नमुद केलेल्या शुल्काचा राष्ट्रीयकृत बॅंकेचा डिमांड ड्राफट सदस्य सचिव/जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांच्या नावे काढुन अर्जासोबत जोडावा आणि संपुर्ण भरलेला अर्ज नमुद केलेल्या आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती व प्रतिज्ञापत्र त्यासोबत जोडावे.

१३.३ मुळ प्रतिज्ञापत्र व आवश्यक कागदपत्रासह पुर्ण भरलेला अर्ज जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा या कार्यालयात दिनांक २५/०७/२०१७ पर्यंत प्राप्त होईल या बेताने पाठविण्यात यावा.

१३.४ उपरोक्त दिनांकानंतर प्राप्त होणारे अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत.

१३.५ ऑनलाईन अर्जाच्या उपलब्धतेसंबधी कोणतीही अडचण असल्यास उमेदवाराने दुरध्वनी क्रमांक ०७१५२-२४३४२८ वर संपर्क करावा.

(१४) उमेदवारांनी मुलाखतीसाठी **(Walk-in-interview)** दिनांक ०१/०८/२०१७ रोजी मुळ कागदपत्रासह मा.जिल्हाधिकारी, वर्धा या कार्यालयात सकाळी १०.०० वाजता उपस्थित राहावे.

(१५) आवेदन शुल्क

अ) खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारासाठी रु.५००/-

ब) मागास प्रवर्गाच्या उमेदवारासाठी रु.३००/-

क) फक्त राष्ट्रीयकृत बॅंकेच्या डिमांड ड्राफटद्वारे शुल्क अदा करावे.

स्थळ :- वर्धा

दिनांक :- १५/०७/२०१७

डॉ. डीं.जी.चव्हाण
सदस्य सचिव तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, वर्धा

शैलेश नवाल
अध्यक्ष तथा
जिल्हाधिकारी, वर्धा

महत्वाच्या सुचना :-

१) उमेदवारांनी मुळ अर्जासोबत यादीतील नमुद कागदपत्राच्या साक्षांकित छायाप्रतीचा एच संच सादर करणे बंधनकारक आहे.

२) तसेच सोबतच्या पृष्ठावरील सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील. सदर सुचनांचे अवलोकन केल्यानंतरच अर्ज भरावा.

- अर्ज सादर करणा-या उमेदवारांसाठी सुचना :-
- खेळाडु उमेदवरांसाठी आवश्यक अर्हता :- जाहीरातीमध्ये नमुद पदांसाठी अर्ज सादर करणा-या खेळाडु उमेदवारांसाठी खालीलप्रमाणे अर्हता धारण करणे/असणे आवश्यक आहे.

१) खेळाडु हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याला मराठी भोषेचे ज्ञान असावे.

२) खेळाडुने सदर पदासाठी सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार आवश्यक असलेली किमान शैक्षणिक व इतर अर्हता प्राप्त केलेली असावी.

३) सदर पदांसाठी त्या-त्या खेळांच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम,व्दितीय अथवा तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण,रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडु राज्य अजिंक्यपद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलंपिक असोसिएशनने संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलंपिक असोसिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रीडा प्राविण्य मिळविणा-या उमेदवारास प्राधान्य राहील. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धामध्ये भाग घेतलेल्या खेळाडुंचा यासाठी विचार करण्यात येणार नाही. राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये (NCC) अंडर ऑफीसर्सची रॅंक मिळवुन राष्ट्रीय छात्र सेनेच्या स्पर्धामध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती.

३ खेळाडुंचे कामगिरीविषयक प्रमाणपत्र संबंधित खेळांचे राष्ट्रीय फेडरेशनचे सचिव, संबंधित खेळाचे राज्य संघटनेचे सचिव या प्राधिका-यांचया स्वाक्षरीचे प्रमाणपत्र विहित नमुन्यांत असणे आवश्यक आहे. या पदावर ज्या खेळाडुंची शिफारस होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पूणे यांच्याकडुन शासन निर्णय दि. ३०/०४/२००५ मधील मार्गदर्शक सुचनांप्रमाणे आहेत किंवा नाहीत हे तपासुन घेण्यात येईल.

४ भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरिल ग्रामिण व महिला क्रीडा स्पर्धातील प्रथम, व्दितीय, तृतीय स्थान प्राप्त किंवा सुवर्ण, रौप्य, कांस्य पदक प्राप्त खेळाडु भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रीडा स्पर्धातील प्रथम, व्दितीय, तृतीय स्थान प्राप्त वि सुवर्ण,रौप्य,कांस्य पदक प्राप्त खेळाडु उमेदवार खेळाडु प्रवर्गासाठी राखीव पदांसाठी अर्ज करु शकतील.

५ खेळाडुंना आरक्षण ठेवण्याबाबत शासन निर्णय क्र. राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२,दि. ३०/०४/२००५,शासन निर्णय क्र. राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२,दि.२१/०६/२००६, शासन निर्णय क्र. राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२,दि.१८/११/२००६, शासन निर्णय क्र. क्रिस्पर्धा-२१०८(प्र.क्र.४४०/०८) क्रीयुसे-२,दि.२०/०९/२०१३, शासन निर्णय क्र. राक्रीधो.२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२,दि.३०/१२/२०१३ आणि वेळोवेकी निर्गमित झालेल्या शासन निर्णयांमधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

६ अर्ज सादर केल्यानंतर नियुक्तीस पात्र ठरणा-या खेळाडु उमेदवारांचे खेळाबाबतचे प्रमाणपत्र हे क्रीडा संचालनालय,पुणे यांचे कार्यालयाकडुन पडताळणी करुन वैध असलेले मुळ प्रमाणपत्र असल्याशिवाय खेळाडु प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश दिला जाणार नाही.

- महिला आरक्षण :-

शासन, महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र. ४१५/का.२ दि. २५/०५/२००१ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार महिला आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारांनी सन २०१७-१८ या कालावधीकरिता वैध असेलले (दि. ३१/०३/२०१८ पर्यंत वैध असलेले) उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमिलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

- मागासवर्गीयांच्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत :-

शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र/बीसीसी-२०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब दि. १२/१२/२०११ नुसार निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांना निवड झालेल्या दिनांकापासुन ६ महिन्याचे आत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र संबंधित जात पडताळणी समितीकडुन प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त करणेत येईल.

- अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-

१) भारतीय नागरीक असल्याबाबतचे प्रमाणपत्राची (Nationality) साक्षांकित छायाप्रत.
२) महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबतचे प्रमाणपत्राची (Domicile) साक्षांकित छायाप्रत.
३) महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ माध्यमिक शालांत परिक्षा (S.S.C.) उत्तीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रकाची साक्षांकित छायाप्रत.व परिक्षा प्रमाणपत्राची (Board Certificate.) साक्षांकित छायाप्रत.
४) महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ उच्च माध्यमिक श परिक्षा (H.S.C.) उत्तीर्ण असल्याबाबतचे गुणपत्रकाची साक्षांकित छायाप्रत व परिक्षा प्रमाणपत्राची (Board Certificate.) साक्षांकित छायाप्रत.
५) वैद्यकिय अधिकारी (एम.बी.बी.एस) पदासाठी :- संविधानिक विद्यापीठाची एम.बी.बी.एस पदवी किंवा भारतीय वैद्यकिय परिषद अधिनियम १९५६(१९५६ चा १०२) ला जोडलेल्या प्रथम किंवा व्दितीय अनुसुचित विनिर्दिष्ट केलेली अन्य कोणतीही अर्हता धारण करीत असलेबाबतच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.
६) शासन निर्णय क्र, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्र.मवैअ-१०१०/३९०/प्र.क्र.३६६/सेवा-३, दिनांक १९ जुन २०१० अन्वये आदिवासी भागातील आरोग्य संस्था घोषित करण्यात आल्या असुन सदर आरोग्य संस्थामधील वैद्यकिय अधिकारी पदावरील कामाचा अनुभव असलेबाबत प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.
७) दि. ३१ डिसेंबर २०१६ पुर्वी अथवा त्या दिनांकास आंतरवासिता (Internship.) पूर्ण असलेबाबतचे सक्षम प्राधिका-याने दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.
८) उमेदवारांनी १०० रुपयांच्या मुद्रांकपत्रावर नोटरीसमोर आवेदनपत्रात नमुद केलेल्या माहीतीच्या अचुकतेबाबत आणि सत्यतेबाबतचे मुळ प्रतिज्ञापत्र.
९) सक्षम प्राधिका-याने दिलेले अनुभवाचे प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत जोडणे आवश्यक आहे.
१०) जाहीरातीत नमुद केल्याप्रमाणे विहित शुल्काचा राष्ट्रीयकृत बॅंकेचा मुळ डीमांड ड्राफट जिल्हा आरोग्य अधिकारी,जिल्हा परिषद,वर्धा यांचे नावे काढुन अर्जासोबत जोडावा.
११) शाळा सोडल्याच्या दाखल्याची (L.C./T.C..) साक्षांकित छायाप्रत.
१२) समाजिक आरक्षणातंर्गत निवड झालेल्या उमेदवरांनी (मागासवर्गीय) मुळ जात प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत व उपलब्ध असल्यास मुळ जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.
१३) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अ.जाती, अ. जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१(सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ८) मधील कलम ४(२)(दोन) मधील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) तत्व,विजा-अ,भज-ब,भज-क,भज-ड,विमाप्र व इमाव हया प्रवर्गाना लागु करण्यात आलेले आहे.

त्यानुसार शासन परिपत्रक सामाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य व विशेषसहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००६/प्र.क्र.१५/भावक-५ दि. ३०/०६/२००६ सोबतच्या सुधारित नमुन्यात उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांनी ३१ मार्च २०१८ पर्यंत वैध असलेले उन्नत व पग्रत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमीलेयर) मुळ प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.

१४) खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेले आरक्षण महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि.२५/०५/२००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षण अंतर्गत अर्ज करणा-या महिला उमेदवारानी ३१ मार्च २०१८ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉनक्रिमीलेयर) मुळ प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.

१५) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र/राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२,दि. ३०/०४/२००५ मधील तरतुदीनुसार मुळ खेळाडु प्रमाणपत्र हे सदर शासन निर्णयालगतच्या परिशिष्ट अ मध्ये नमुद खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकारी यांचे असावे.

१६) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतुदीनुसार आवश्यक अर्हता म्हणुन विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

१७) छायाचित्र ओळख पुरावा (ओळखपत्र/Photo Identiy Card) (आधारकार्ड/राज्य निवडणुक आयोगाचे निवडणुक ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स इ.) ची साक्षांकित छायाप्रत.

१८) मुलाखतीच्या दिवशी सर्व मुळ कागदपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१९) सर्व कागदपत्रांची व निकषांची पुर्तता झाल्याशिवाय उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात येणार नाही,याची नोंद घ्यावी.

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
**RECRUITMENT OF MEDICAL OFFICER GROUP – A**

| | | | |
|---|---|---|---|
| **Post Applied For :** | | | |
| Name | | Recent Passport size photograph<br>Candidate Signature (in Box) | |
| Name in Marathi | | | |
| Fathers/ Gurdians Name | | | |
| Mother Name | | | |
| Fathers/ Gurdians Occupation | | | |
| Gender | Male / Female: | Marital Status | |
| Date of Birth | / / | Age as on (31.03.2016 | |
| Mother Tongue | | Email-ID | |
| Contact and Marital Information | | | |
| Correspondence Address in Marathi | | | |
| Permanent Address | | | |
| Whether Spouse working with Govt. Department ? | | Spouse Place of Posting | |
| Profession of the Spouse | | | |
| Reservation | | | |
| Category | | Caste Certificate | |
| Caste | | Sub – Cast | |
| Non – Creamy Layer Certificate | | Annual Income | |

| | | |
|---|---|---|
| Total Experience | (A)Befor essential Qualification | |

| | |
|---|---|
| Social Reservation | |
| Physically Handicapped | |

**Fees Details:**

| Sr.No | Demand Draft no. | Amount | Bank Name |
|---|---|---|---|
| | | | |

**General Information**

| | | | |
|---|---|---|---|
| Possesses Adequate Knowledge to read, write and speak Marathi Language | | | |
| Date of Completion of Compulsory Rotating internship (DD/MM/YYYY) | | | |
| Date of Registration (DD/MM/YYYY) | Registration Number | Date of Renewal (If any (DD/MM/YYYY) | |
| Has Successfully Completed MS-CIT? | | | |
| Preffered area of Posting | | | |

| MBBS Yearwise Marks : | | |
|---|---|---|
| **Year** | **Marks** | **Out of Marks** |
| 1st year | | |
| 2nd year | | |
| 3rd year | | |
| 4th year | | |
| Total | | |
| Percentage Marks in MBBS | | |
| Has any other Post Graduate Degree / Diploma in other Medical Subject | | |
| Subject | | |

(B)After Essential Qualification

(c)After higher Qualification

**Qualifying Examination :**

| Sr.no. | Faculy | Programm | Specialisation | Board/University | Passing year | Class | Total Marks Obtained | Total out of marks | percentage |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |

**Experience:**

| Sr.no | Post Held | Organisation Name | Organisation Address | Nature of Appointment | Is the Office / Institution owned by Govt.of Maharashtra |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Sr.no | Exact date to be given (from-to) | Total period (DD/MM/YYYY) | Scale of pay | Basic pay (in Rs.) | Nature of Post | Resons for leaving along with discharge certificate |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

Place:

Date: Candidate Full Name & Signatur

## महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञा पत्राचा नमुना-अ

| Required Document | |
|---|---|
| **Sr.No.** | **Documents** |
| | |
| | |
| | |

I hereby declare that all the information furnished by me in this application from are true.complete and correct to the best of my knowledge and bilief . I do understand that . I need to obtain and produce all the required original certificates enlistedin the form by me at the time of document verification. I understand that entries made by me in this application from are final and binding on me. I further declare that in the event anyinformantion being found fals or incorrect I shall be liable for disqualification as mentioned in the notification.

**प्रतिज्ञापन (नियम- ४ पहा )**

श्री/श्रीमती/कुमारी------------------------------------------------------------श्री. (वडीलाचे /पालकाचे नांव)------------------------------------------------------यांचा/यांची/मुलगा/मुलगी/पत्नी वय---------वर्ष----------राहणार-------------------------------------------------------------------- -------------------------याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करितो /करितो की,

(१) मी--------------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

(२)आज रोजी मला-------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यांनतर जन्माला आलेल्या मुलाची संख्या-----------आहे.(असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

(३)हयात असलेल्या मुलाची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन यांची मला जाणीव आहे.

ठिकाण-

**अर्जदाराची सही//नांव**

दिनांक - / /२०१७

# Affidavit

Affidavit to be furnished by a person along with the Application for the post of Medical Officer MMHS Group A in the pursuance of the Advertisement Number------- Date……………………….. Published by Selection Board for Medical Officer Recruitment, Established by Public Health Dept.

Govt. Of Maharashtra.

I ………………………………………………………………… Son / Daughter / Wife of……………………………………

Aged about …………………..Years, resident of……………………………………………………………… Do here by

Solemnly affirm/state on oath as under :-

1. I Have submitted my application for the Post of ………………………………………………………………in Pursuance of the Advertisement No …………………….. dated………………………………………..
2. I have read the provisions in the Rules and Notification of the Selection Board carefully and I here by undertake to abide by them. I further declare that I fulfill all the conditions of eligibility regarding age limits, educational qualifications, experience if any, concession etc. prescribed for the Post herein above.
3. I hereby declare that all the statements made in this application are true, complete and correct to the best of my knowledge & belief. In the event if my information being found false or incorrect or I am detected ineligible. I am liable to be dismissed from service.
4. If information given in this Affidavit on oath is found to be false i.e. not supported by documentary proof at the time of verification by the Selection Board. I will be liable to be Blacklisted and Debarred from all further examinations and selection processes of the Selection Board and liable for disciplinary proceedings if already in Government Services.

**Place :**

**Date :** **Signature of Deponent**

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

## VERIFICATION

I, the above named deponent do hereby verify and declare that the contents of this Affidavit are true and correct to the best of my knowledge and belief. No Part of it is false and nothing material has been concealed therein.

Verified at …………………………………………… this …………………………………………………… Day of ……………………………………………. 20………

**Deponent**

Notary Seal

# जिल्हा समिती,वर्धा


*डॉ.डी.जी. चव्हाण*
*सदस्य सचिव तथा*
*जिल्हा आरोग्य अधिकारी*

आरोग्य सेवा

Phone No. : 07152-242034
Fax No. : 07152-244871
Email : dhowardha@rediffmail.com


पत्र क्र.जिपव/आरोग्य/आस्था-१अ / /१७, दि. :१५/०७/२०१७

प्रती,

संपादक,

...........................

विषय :- जाहिरात प्रसिद्ध करण्याबाबत.

वरिल विषयान्वये जिल्हा समिती वर्धा मार्फत वैद्यकिय अधिकारी, गट-अ दर्जाची पदे मुलाखतीद्वारे (Walk-in-interview) भरण्यात येणार आहेत. सदर पदांचे भरतीचे जाहिरातीकरिता आपले वर्तमानपत्राव्दारे जाहिरात प्रसिध्दीकरिता देण्याचे ठरले आहे. सदर जाहिरात आपल्या वर्तमानपत्रामध्ये (४ कॉलम × १० सेमी.) या आकारात दि.१६/७/२०१७ रोजीच्या अंकात प्रसिध्दी करावी हि विनंती.

जाहिरात प्रसिध्द करतांना खालीलप्रमाणे अटींचे पालन करावे.

१) जाहिरातीकरीता सुचनेपेक्षा जास्त जागा वापरल्याचे आढळल्यास उपरोक्त आकाराचेच देयक अदा करण्यात येईल.
२) जाहिरात प्रसिध्द करतांना जाहिरातीचा मथळा, अधिकाऱ्याचे नाव, पदनाम यासाठी १४ टाईपचा तर जाहिरातीकरीता १२ टाईपचा वापर करण्यात यावा.
३) जाहिरात योग्य प्रकारे प्रसिध्द न झाल्यास, चुका झाल्यास, चुकीची दुरुस्ती दुसऱ्या दिवशीच्या अंकात विनामुल्य छापावी लागेल.
४) जाहिरात ठरवुन दिलेल्या तारखेलाच प्रसिध्द करणे आवश्यक आहे. या तारखेला जाहिरात प्रसिध्द न झाल्यास देयकाची रक्कम अदा करण्यात येणार नाही.
५) जाहिरातींचे भाषांतर करावयाचे झाल्यास ते आपणास विनामुल्य करावे लागेल.
६) जाहिरातीचे देयक आदेशाचा क्रमांक व दिनांकासह शासन मान्य दराने दोन प्रतीत सादर करावे लागेल.
७) जाहिरातीच्या देयकाची तिसरी प्रत प्रकाशित करण्यात आलेल्या अंकासह न चुकता ३ दिवसांच्या आत या कार्यालयास पाठविण्यात यावी.
८) जाहिरात प्रसिध्द करतांना ती वाचकांच्या चटकन लक्षात येईल अशा योग्य जागी सुबक व सुस्पष्ट मजकुरासह प्रसिध्द करावी.
९) जाहीरात पुरवणी पानावर न छापता मुळ अंकाच्या पृष्ठांवर छापावी.
१०) सदर जाहिरात ही महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक दि.३१ डिसें. २००९ व महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शा.नि.दि. १/१२/२०१६ नुसार देण्यात येत आहे.

सहपत्र - जाहिरातीचा मसुदा

सदस्य सचिव
जिल्हा समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.वर्धा

प्रतिलीपी माहितीस्तव सविनय सादर -

१) मा. अध्यक्ष, जिल्हा समिती तथा जिल्हाधिकारी, वर्धा.
२) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.वर्धा
३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जि.प.वर्धा यांना माहितीकरीता समादराने अग्रेषित.

सदस्य सचिव
जिल्हा समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.वर्धा